पुढारी

# विद्यापीठ परीक्षेला ६१ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रांतर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षा सुरू झाल्या आहेत. मंगळवारी ६७ विषयांच्या परीक्षा झाल्या असून विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ६१ हजार ८० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने १९ जुलैपासून २७६ महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील परीक्षांना प्रारंभ झाला आहे. महाविद्यालयस्तरावरील १८६ परीक्षांपैकी आजअखेर ६६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात 'नॅनो सायन्स, नॅनो टेक्नॉलॉजी करिअर संधी'वर व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे बुधवार (दि. २७) पासून 'नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

बारावी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी हे व्याख्यान आहे. व्याख्यानमाला ३० जुलैपर्यंत चालणार आहे. विद्यार्थी, पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठ : ६६ परीक्षांचे निकाल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाकडून महाविद्यालयीन स्तरावरील १८६ पैकी ६६ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. मंगळवारी बी.एस्सी. (बायोटेक), बी. एस्सी. (आयटी), बी.एस्सी. (शुगर टेक्नॉलॉजी), बी.एस्सी. (ॲनिमेशन) आणि बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) आदी परीक्षांचे सेमिस्टर १ आणि २ चे निकाल घोषित केले. मार्च-एप्रिल उन्हाळी सत्राच्या एकूण ७४१ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षांपैकी ७८ परीक्षा दि. १९ जुलैपासून एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने सुरू आहेत. मंगळवारी एकूण अभ्यासक्रमाच्या ६७ विषयांच्या परीक्षा झाल्या. ६१ हजार ८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

सकाळ

# ६६ परीक्षांचे निकाल जाहीर

## ६१ हजारांवर परीक्षार्थी; ६७ विषयांच्या परीक्षा सुरळीत

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना १९ जुलैला सुरुवात झाली. आजपर्यंत १८६ परीक्षा झाल्या आहेत. त्यातील ६६ परीक्षांचे निकाल जाहीर केले. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील ६१ हजार ८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे.

परीक्षांना महिनाभर उशिरा सुरवात झाली, तरीही सर्व परीक्षा सुरळीत झाल्या आहेत. आजपर्यंत ५६१ परीक्षांपैकी ७८ परीक्षा पार पडल्या. आज ६७ विषयांच्या परीक्षा पूर्ण झाल्या. बी.एस्सी., बी. एस्सी. (फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी), बी.एस.सी. (आय.टी.), बी.एस.सी. (कॉम्प्युटर सायन्स), एम.एस.सी. (टेक्नॉलॉजी), बी.कॉम., बी.कॉम. (आय.टी.), बी.टेक., बी फार्म., एम.फार्म., एम.बी.ए., एम.ए. यासह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा आज झाल्या. झालेल्या परीक्षांपैकी ६६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. यामध्ये बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) सेमीस्टर १ आणि २, बी.एस्सी. (शुगर टेक्नॉलॉजी) सेमी १ व २, बी.एस.सी (ॲनिमेशन) सेमी १ व २, बी.ए.(ड्रेस मेकिंग अँड फॅशन डिझायनिंग, को-आर्डिनेशन) अशा ६७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

### भरारी पथकाचे लक्ष

परीक्षेत गैरप्रकार होऊ नये, यासाठी भरारी पथके महाविद्यालयांमध्येच लक्ष ठेवतात असे नाही तर प्रश्नपत्रिका कोण कधी डाऊनलोड करते, याचीही माहिती त्यांच्याकडे आहे. त्यामुळे कोणीही कोणताही गैरप्रकार केल्यास त्यांच्यावर प्रमाद समिती कारवाई करेल.

सकाळ

# इंटेरिअर डिझाईनसाठी 'डेक्कन'मध्ये प्रवेश सुरू

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : येथील डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरियर डिझाईन संस्थेत इंटेरियर डिझाईनसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. या महाविद्यालयात विविध प्रकारचे व्यावसायिक कोर्स उपलब्ध असून, शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीत येथील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संस्थेत बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईनची शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त पदवी व महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळ मान्यताप्राप्त डिप्लोमा इन इंटेरिअर डिझाईन अभ्यासक्रम आहे.

या कोर्ससोबत व्यावसायिक शिक्षण मंडळाचे रोजगार कौशल्य आधारित अभ्यासक्रम बिल्डिंग साईट सुपरवायझर हा एक वर्ष कालावधीचा आणि प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग तसेच विद्यापीठाचे प्रमाणपत्र असणारे इंटेरिअरस्केप गार्डन डिझाईन आणि व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टी हे कमी कालावधीचे कोर्सेसही संस्थेमध्ये सुरू आहेत. पदवी, पदविका व सर्टिफिकेट कोर्सच्या माध्यमातून कमी कालावधीत विद्यार्थी हे कोर्स पूर्ण झाल्यानंतर स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकतात.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे घेण्यात आलेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन इंटरस्केप गार्डन डिझाइन' व 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीज्' या अभ्यासक्रमात संस्थेचा निकाल १०० टक्के लागला आहे. तरी प्रवेशाबद्दलच्या अधिक माहितीसाठी डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरियर डिझाईन, तिसरा मजला, कॉसमॉस कॉम्प्लेक्स, न्यू शाहूपुरी, स्टेशन रोड या पत्त्यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
27 JUL 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'डेक्कन'मध्ये इंटेरिअर डिझाईनसाठी प्रवेश सुरु

कोल्हापूर

इंटेरिअर डिझाईन ह्या क्षेत्राचे परिपूर्ण व्यावसायिक ज्ञान देणाऱ्या कोल्हापुरातील डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरियर डिझाईनमध्ये विविध प्रकारचे व्यावसायिक कोर्स उपलब्ध आहेत. तसेच शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संस्थेत बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईनची शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त पदवी व महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ मान्यताप्राप्त डिप्लोमा इन इंटेरिअर डिझाईन अभ्यासक्रम असून प्रवेश प्रक्रिया चालू आहे. सदरच्या कोर्ससोबत संस्थेत महाराष्ट्र राज्य व्यावसायिक शिक्षण मंडळ यांचा रोजगार कौशल्य आधारित अभ्यासक्रम बिल्डिंग साईट सुपरवायझर हा एक वर्ष कालावधीचा व प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त तसेच विद्यापीठाचे प्रमाणपत्र असणारे इंटेरिअरस्केप गार्डन डिझाईन आणि व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टी इत्यादि कमी कालावधीचे कोर्सेस संस्थेमध्ये सुरु आहेत.

पदवी, पदविका व सर्टिफिकेट कोर्सच्या माध्यमातून कमी कालावधीत विद्यार्थी सदर कोर्स पूर्ण झाल्यानंतर स्वत:चा व्यवसाय सुरु करु शकतो व इंटेरिअर डिझाईन आणि विविध क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करु शकतो. निकाल १०० टक्के शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचेमार्फत घेण्यात आलेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन इंटरस्केप गार्डन डिझाइन" व 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीज, कोल्हापूर या संस्थेचा निकाल १००टक्के लागला आहे. तरी प्रवेशाबद्दलच्या अधिक माहितीसाठी संस्थेच्या खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरियर डिझाईन, ३ रा मजला, कॉसमॉस कॉम्प्लेक्स, न्यू शाहूपुरी, स्टेशन रोड, कोल्हापूर.